CMYK

बुलढाण्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुकाध्यक्षावर प्राणघातक हल्ला >>पान 2

एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत यासाठी कोपरीतील महिलांनी महाआरती करत गणरायाला घातले साकडे >>पान 3

मेहकरमध्ये दोन गटात वाद; गाड्यांची जाळपोळ २३ जणांना अटक >>पान 4

**सुविचार**

मनुष्याच्या इच्छाशक्तीपेक्षा मोठी शक्ती दुसरी नाही.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




'कांगुवा' फ्लॉप होताच सूर्याला मिळाली वाईट बातमी! बंद झाला ३५० कोटींचा चित्रपट

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई आतील पान

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 106 ■ मंगळवार, दि. 26 नोव्हेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# सत्तास्थापनेनंतर महायुती सरकार पहिला निर्णय लाडकी बहिण योजनेबाबत घेणार?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :लोकसभा निवडणुकीमध्ये दारुण पराभवाला सामोरे गेल्यानंतर जून महिन्यामध्ये सादर करण्यात आलेली लाडकी बहीण योजना महायुती सरकारसाठी नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत अक्षरश: वरदान ठरली. या एका योजनेच्या जोरावर महायुतीला पुन्हा सत्तेमध्ये येण्यास संधी मिळाली. महायुतीला राज्यातील लाडक्या बहिणींनी भरभरून मतदान देत भक्कम बहुमताने सरकार स्थापन करण्यासाठी संधी दिली आहे. त्यामुळे आता महायुतीने सत्तेमध्ये आल्यानंतर पहिला निर्णय या लाडकी बहीण योजने संदर्भात घेण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीनंतर



विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी महायुतीकडून धडाधड निर्णय घेण्यात आले. अनेक शासन निर्णय सुद्धा जारी करण्यात आले होते. मात्र, या सर्वांमध्ये महत्त्वाचा घटक लाडकी बहीण योजना होता. या योजनेचे आगाऊ पैसे देण्यात आल्याने मतदारांमध्ये सकारात्मक संदेश देण्याचा प्रयत्न महायुतीकडून करण्यात आला होता.

योजनेची रक्कम पंधराशे रुपयांवरून २१०० रुपये केली जाण्याची शक्यता

लाडकी बहीण योजनेचे पंधराशे रुपये देण्यात आले होते. मात्र, आता ही रक्कम वाढवण्याची घोषणा महायुतीच्या जाहीरनाम्यामध्ये करण्यात आली होती. त्यानुसार या योजनेचे १५०० वरून २१०० रुपये करण्यात येतील, असं जाहीर करण्यात आलं होतं. तो निर्णय सरकार स्थापन होताच पहिल्याच कॅबिनेट बैठकीमध्ये घेतला जाण्याची शक्यता आहे. सत्ता स्थापनेनंतर पहिलं हिवाळी अधिवेशन नागपूरमध्ये पार पडणार आहे. या अधिवेशनामध्येच या योजनेची रक्कम पंधराशे रुपयांवरून २१०० रुपये करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे ज्या योजनेनं यश मिळवून दिला त्या योजनेबाबत दिलेलं आश्वासन महायुती सरकार लवकर पूर्ण करणार असल्याची शक्यता आहे.

दुसरीकडे महाविकास आघाडीकडूनही योजनेची रक्कम डबल करण्याचा आश्वासन देण्यात आलं होतं. यासाठी पाच गॅरंटी सादर करण्यात आल्या होत्या. मात्र, राज्यातील लाडक्या बहिणीने पुन्हा एकदा महायुतीकडे कल दिल्याने आता लाडक्या बहिणींना योजनेची रक्कम वाढवली गेल्यास दरमहा २१०० रुपये मिळणार आहेत. जवळपास दोन कोटी ३२ लाख महिलांना या योजनेचा थेट लाभ मिळत आहे. ही रक्कम थेट बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात येत असल्याने महायुती सरकारसाठी विधानसभा निवडणुकीमध्ये एक प्रकारे गेम चेंजर ठरली आहे.

## ठळक...

### तर बाकीचे आमदार गायब होतील चंद्रशेखर बावनकुळे यांचा ठाकरेंना इशारा



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : आज भारतीय जनता पक्षाची बैठक झाली आहे. राज्यात दीड कोटी प्राथमिक सदस्य असणार प्रत्येक विधानसभा मध्ये सक्रिय कार्यकर्ते नेते निर्माण करतो.भारतीय जनता पक्ष ही मजबुतीने स्थानिक स्वराज्य संस्थाची निवडणूक लढवणार आहेत. उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांना ललकारलं आहे. देवेंद्र फडणवीसांना जास्त ललकारलं तर बाकीचे आमदार गायब होतील. असा इशारा भारतीय जनता पक्षाचे मुंबई अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला. माध्यमांशी बोलताना बावनकुळे पुढे म्हणाले की, काँग्रेससोबत जाण्याचा फटका उद्धव ठाकरेंना लोकसभेत ही मोठा फटका बसला होता. महायुतीतील आमची युती १६५ वर गेली, उद्धव ठाकरे काँग्रेससोबत आणखी राहिले तर त्यांच्याकडे केवळ २ आमदार उरतील. काँग्रेचे हाल वाईट त्याहूनही उद्धव ठाकरे यांचे हाल वाईट आहेत. असा टोमनाही त्यांनी ठाकरे यांना लगावला. तसेच देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होतील का असा प्रश्न केला असता चंद्रशेखर बावनकुळे यांनी पक्षातील सर्वांना वाटते की आपला मुख्यमंत्री व्हावा, असे म्हणाले.

### आम्ही विरोधी पक्षनेते पदाची मागणी करु आमदार भास्कर जाधव यांचा दावा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : सरकार स्थापन झाले की, आम्ही विरोधी पक्षनेतचे पदाची मागणी करू, अशी माहिती उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे आमदार भास्कर जाधव



यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की,संपूर्ण महाराष्ट्र माझे अभिनंदन करत आहे,सर्वांचे आभार मानतो, माझी गटनेतेपदी निवड झाली हे अनपेक्षित आहे. स्वत: माझी निवड व्हावी असे वाटत नव्हते, मी ग्रामीण भागात राहणारा माणूस आहे. मी मुंबईत राहणारा माणूस नाही, मुंबईमध्ये राहणाऱ्या माणसाला मंत्रालयात जाणे–येणे सोयीच ठरते, त्यामुळे ही निवड मुंबईमध्ये राहणाऱ्या एका ज्येष्ठ नेत्याची व्हावी म्हणून आदित्य ठाकरे यांच्या नावाचा मी आग्रह धरला होता. पण अध्यक्षांनी माझी निवड केली,तसा आदेश दिला. त्यामुळे तो मी स्वीकारला. शपथ विधी झाला की आम्ही राज्याच्या मुख्यमंत्री आणि विधानसभेच्या अध्यक्षांची निवड झाली की सरकारकडे विरोधीपक्षनेते पद मिळावे,याची रीतसर मागणी करु,अशी माहिती आमदार भास्कर जाधव यांनी माध्यमांश बोलताना दिली.

### जेव्हा सरकार स्थापन होईल तेव्हा विरोधी पक्षनेता ठरेल : अंबादास दानवे



**मुंबई/प्रतिनिधी** : उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली ही विधीमंडळ सदस्यांची दि.२५ नोव्हेंबर रोजी बैठक होती. ज्यामध्ये नवनिर्वाचित सदस्य, विधानपरिषदेचे सदस्यांची उपस्थिती होती. यावेळी त्यांनी सरकारवरती अजून दावा केला नाही, जेव्हा सरकार स्थापन होईल तेव्हा विरोधीपक्षनेतेपदी निवड केली जाईल, अशी माहिती उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे विधान परिषद आमदार तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी अंबादास दावने म्हणाले की, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या विधानसभा गटनेतेपदी भास्कर जाधव यांची नियुक्ती केली आहे. आदित्य ठाकरे यांची विधिमंडळ गटनेते पदी नियुक्ती केलेली आहे. सुनील प्रभू यांची पुन्हा प्रतोदपदी निवड झाली आहे. आता सगळे आमदार विधीमंडळात चालले आहेत. पक्षाचे जे काही कामकाज आहे ते पूर्ण करण्यासाठी आम्ही जात आहोत. सगळे निवडून आलेले आमदार आजच्या बैठकीला उपस्थित होते. यावेळी विविध विषयांवर चर्चा झाली असून जेव्हा सरकार स्थापन होईल, तेव्हा विरोधी पक्षनेता ठरेल, अशी माहिती विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिली.

## शिवसेनेतील बंडानंतर उद्धव ठाकरेंची खबरदारी; नव्या आमदारांकडून शपथपत्र लिहून घेणार

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यातील विधानसभेच्या निकालाने महाविकास आघाडीचे पाणीपते झाल्याचे पाहायला मिळत आहे. कारण, राज्यात भाजप महायुतील तब्बल २३६ जागांवर स्पष्ट बहुमत मिळाले असून भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. भाजप नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजपने तब्बल १३२ जागांवर विजय मिळवला आहे. तर, शिवसेना शिंदे गटानेही तब्बल ५७ जागांवर विजय मिळवला असून गत कार्यकाळात शिवसेनेत झालेल्या बंडानंतर जेवढे आमदार एकनाथ शिंदेंसोबत गेले होते, त्यापेक्षा जास्त आमदार आता विजयी झाले आहेत. तर, शिवसेना युबीटी पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचे २० आमदार निवडून आले आहेत. महाविकास आघाडीत सर्वाधिक जागा उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला मिळाल्याचं दिसून येत आहे. मात्र, सत्तास्थापनेपूर्वीच उद्धव ठाकरेंनी शिवसेनेच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक बोलावली असून आमदारांकडून शपथपत्र लिहून घेतले जाणार असल्याची माहिती आहे. गतवेळी झालेल्या शिवसेनेतील बंडातून मोठा धडा घेत ठाकरेंकडून ही खबरदारी घेतली जात असल्याचे दिसून येते,

मातोश्रीवर शिवसेना ठाकरे गटाच्या नवनिर्वाचित आमदारांच्या बैठकीत अनेक महत्त्वपूर्ण घडामोडी घडणार आहेत. या बैठकीत शिवसेना युबीटी पक्षाच्या गटनेते, प्रतोद संदर्भात आज निर्णय अपेक्षित आहेत. त्यामध्ये, नवनिर्वाचित आमदारांकडून शपथपत्र लिहून घेतलं जाणार असल्याचे समजते. नवनिर्वाचित २० आमदारांकडून प्रतिज्ञापत्र लिहून घेतले जाणार असून पक्षामध्ये पक्षप्रमुखांचा निर्णय हा अंतिम राहणार, पक्षाने घेतलेल्या निर्णयाशी सर्व आमदार बांधिल असतील, अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र सर्व नवनिर्वाचित आमदारांकडून लिहून घेतले जाणार असल्याची माहिती आहे.

## मुख्यमंत्रीपदाबाबत मोठी बातमी! भाजपचं ठरलं, बिहार पॅटर्न राबवणार?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यातील विधानसभा निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळाले. राज्यात भाजपने आतापर्यंतची ऐतिहासिक कामगिरी केली. भाजपने पहिल्यांदाच १३२ जागांवर विजय मिळाला. महायुतीला मिळालेल्या यशानंतर महायुतीचा मुख्यमंत्री कोण होणार, याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कायम राहणार की देवेंद्र फडणवीस यांना पुन्हा संधी मिळणार, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. राज्याच्या मुख्यमंत्रीपदाबाबत नवी माहिती समोर आली आहे.

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महायुतीने दणदणीत विजय मिळवला. या विजयात भाजप सर्वाधिक उमेदवार निवडून आले. त्या पाठोपाठ शिवसेनेचे उमेदवार विजयी झाले आहेत. सर्वाधिक उमेदवार निवडून आल्यामुळे भाजपचे नेते त्यांचाच मुख्यमंत्री होणार असल्याचा दावा करत आहे. मात्र, ज्यांच्या नेतृत्वाखाली महायुतीला भरघोस यश मिळालं त्यांनाच पुन्हा मुख्यमंत्री करून महाराष्ट्रात बिहार प्रमाणे मुख्यमंत्री पॅटर्न राबवण्याचं भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाचं नियोजन असल्याचं वरिष्ठ सूत्रांनी सांगितले आहे. भाजपच्या या निर्णयामागे काही महत्त्वाची कारणे असल्याचे सांगण्यात येत आहे.

एनडीएमधील राजकारण महत्त्वाचं

भाजपचं एनडीए मधलं राजकारणही महत्वाचं आहे. गरज असेपर्यंत भाजप मित्रपक्षांना वापरतोष्ठ शिंदेंची गरज संपली, आता भाजपचा मुख्यमंत्री होणार', 'मित्रपक्षांना फसवण्याची भाजपची खोड', 'उद्धव ठाकरेंप्रमाणे शिंदेंना दगाफटका होणारष्ठअसा आरोप विरोधक विशेषत: ठाकरे गटाकडून करण्यात येत आहे. भाजप शब्दावर ठाम असतो, हा संदेश महाराष्ट्रातही देण्यासाठी घवघवीत यशानंतरही बिहारप्रमाणे महाराष्ट्रात एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रिपद देण्याबाबत भाजपच्या केंद्रीय नेत्यांचा विचार सुरू आहे.

केंद्रात एनडीए मजबूत ठेवणे गरजेचे आहे. त्यामुळे भाजप मित्रपक्षांवर अन्याय करत नाही हा मेसेज देण्याचा प्रयत्न होऊ शकतो. एनडीएमध्ये शिवसेना चौथा सर्वात मोठा मित्र पक्ष आहे. इतर राज्यातील मोठ्या विजयानंतरही भाजपच्या केंद्रातील सर्वोच्च नेतृत्वाने दूरदृष्टीने अनपेक्षित निर्णय घेऊन विजयी समीकरण कायम ठेवले होते.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकडे लक्ष

महाराष्ट्रात पुढील तीन महिन्यात सर्वच प्रलंबित महापालिकांच्या आणि नगरपालिकांच्या निवडणूका होणार आहेत. या निवडणुकीतही विजयी चेहरा म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याच लोकप्रियतेचा फायदा महायुतीला होणार असल्याचा अंदाज आहे. महायुती एकसंघ आणि भक्कम ठेवणं महत्त्वाचं आहे. त्यामुळे महाराष्ट्रात मुख्यमंत्री बदलू नये, असं राजकिय समीकरण मजबूत होताना दिसत आहे.

## निवडणुकीचा निकाल ही जरांगे यांना चपराक

### लक्ष्मण हाके यांची जरांगे पाटलांवर टीका

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना लोक कंटाळले आहेत.१३० जागा पाडायची भाषण केली, जिथे मेसेज दिला तिथे लोक मोठ्या मताधिक्याने लोक निवडून आले आहेत.निवडणुकीचा निकाल हा मनोज जरांगेना चपराक आहे. अशी टीका ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केली. ते पुणे येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी ओबीसी नेते लक्ष्मण हाके म्हणाले की,जरांगे खोटं बोलत आहे, की मी जिथे सभा घेतल्या तेथील उमेदवारांना चांगली मत पडली आहेत. आता ही जरांगे पाटील विषयी शेवटची पत्रकार परिषद घेत आहे.



खुळचट बावळट जरांगे काहीही बोलत आहेत.आम्ही राजेश टोपेला पाडले, जरांगे लबाड माणूस आहे. निवडणूक निकाल ही जरांगे यांना चपराक आहे. नाक गेले तरी भोक म्हणणारी ओलाद जरांगे आहेत. आम्ही ओबीसीला जवळ म्हणणारी आहेत. मी जाहीर भूमिका घेतली होती. बाप्पा सोनवणे निवडून आले तेव्हा ते म्हणत होते मी जरांगेमुळे निवडून आलो. मला विधान परिषद काय कॅबिनेट मंत्रीपद हवय, गृहमंत्री अर्थमंत्री पद हवय,मी अर्ध्या समाजाचे प्रतिनिधित्व करतोय असे म्हणत होते. मा! आता विधानसभेच्या निवडणुकीचा लागलेला निकाल हा जरांगे यांना चपराक आहे. अशी टिका ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर केली.

## रडीचा डाव खेळून राम शिंदे यांचा अजित पवारांवर पराजयाचे खापर फोडण्याचा प्रयत्न; आमदार रोहित पवार यांची टिका

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राम शिंदे नैराश्यामध्ये आहेत, खुप जास्त पैसा वापरुन सुद्धा प्रत्येक घरी जाऊन सुद्धा त्यांचा पराजय झाला आहे. ते गुप्त कॉंट्रॅक्ट म्हणत असतील तर मी अजित पवार, अमित शाह, देवेंद्र फडणवीस, बावनकुळे यांच्या सोबत केलेले आहे. राम शिंदे, भाजप कार्यकर्तेच माझ्या मतदात संघात प्रचाराला आले नाहीत,असे बोलत आहेत. ते हास्यास्पद आहे. २०१९ मध्ये सुद्धा ते अशाच पद्धतीने बोलेले होते आणि खापर तेव्हा त्यांनी विखे पाटील यांच्या डोक्यावर फोडलं होत.या रडीचा डाव खेळून अजित पवारांवर पराजयाचे खापर फोडत आहेत. अशी टिका शरद पवार राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी केली. माध्यमांशी संवाद साधताना रोहित पवार म्हणाले की, आताही त्यांचा रडीचा डाव खेळायचा प्लॅन आहे. अजित पवारांवर खापर फोडायच आणि मग कुठून तरी मंत्रीपद मिळतय का बघायचे, ते कोणत्याही लेव्हला जाऊन बोलतायत, मी बारामती गेलो असतो तर तुतारीला मत दिले असते, मात्र त्या दिवशी मी माझ्या मतदार संघात होतो. तिथे गुंडशाही सुरु केली नसती तर मी बारामतीला गेलो असतो, अजित पवारांनी माझ्या मतदारसंघात सभा का घेतली नाही हे मला सांगता येणार नाही, ते बारामतीत गुंतले होते. हार जित होत असते, त्यांनी त्यांचा पराजय स्वीकारावा, त्यांनी खापर न फोडता लोकशाहीला ताकद दिली पाहिजे, जिथे आमचे उमेदवार पडले आहे. त्याविषयी चर्चा केली जाणार आहे. सगळ्या ईव्हाएम मशीन गुजरातच्या आहेत. त्यामुळे लोक निकालावर शंका घेत आहेत. असेही शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी सांगितले.



CMYK

## संविधान; भारताचा राष्ट्रीय ग्रंथ

आज २६ नोव्हेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. आजच्याच दिवशी म्हणजे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे संविधान स्वीकारण्यात आले त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. भारतीय संविधानाला यावर्षी ७५ वर्ष पूर्ण होत आहे. गेली ७५ वर्ष संविधानाने देशाला एकसंध ठेवण्याचे काम केले आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही संविधानामुळेच जिवंत आहे. संविधान हा देशाचा राष्ट्रीय ग्रंथ आहे. देशाचे अखंडत्व संविधानामुळेच टिकून आहे. भारतातील विविधता, अनेक भाषा, संस्कृती, धर्म, जात, पंथ, वंश, वेगवेगळ्या चालीरीती, रूढी–परंपरा या सर्वांन एका सूत्रात बांधणारा गुरुमंत्र म्हणजे संविधान. आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही घडविण्याच्या व त्याचा सर्व नागरिकांस; सामाजिक आर्थिक व राजनैतिक न्याय; विचार, अभिव्यक्ती, विश्र्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य दर्जाची व संधीची समानता; निश्र्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्यासर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्र्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ; आमच्या संविधानसभेत आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण करीत आहोत. ही भारतीय संविधानाची उद्देशिका आहे. संविधानाची उद्देशिका हाच संविधानाचा आत्मा आहे. संपूर्ण संविधान याच उद्देशिकेवर आधारित आहे. भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्य यांना फार महत्त्व देण्यात आले आहे. स्वातंत्र्याचा हक्क, समतेचा हक्क, शैक्षणिक हक्क, सांस्कृतिक हक्क, धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क हे मूलभूत हक्क घटनेने नागरिकांना बहाल केले आहेत. त्याच बरोबर प्रत्येक नागरिकांनी राष्ट्रीय प्रतीकांचा मान राखणे, संविधानाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करणे, देशाचे सार्वभौमत्व कायम राखणे, देशाची अखंडता कायम राखणे, सार्वजनिक मालमत्तांची काळजी घेणे, देशासाठी नेहमी तत्पर राहणे ही मूलभूत कर्तव्यही संविधानात दिली आहेत. आपल्या हक्कांसोबत आपल्या कर्तव्याचीही जाणीव करुन देणारे व जगातील सर्वात मोठे असणाऱ्या भारतीय संविधानाच्या निर्मितीचा इतिहास जाणून घ्यायला हवा.

२६ जानेवारी १९३० ला लाहोर येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय कॉंग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात पंडित नेहरूंनी तिरंगा फडकावून संपूर्ण स्वराज्याची घोषणा केली. त्याच महत्वपूर्ण दिवसाचे स्मरण म्हणून २६ जानेवारी हा दिवस संविधानाची अंमलबजावणी करण्यासाठी निवडण्यात आला. ९ डिसेंबर १९४६ ला घटना समितीचे कामकाज सुरू झाले. ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ राजेंद्र प्रसाद यांची घटना समितीचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. बी एन राव हे या समितीचे सल्लागार होते. या समितीत पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, गोविंद वल्लभ पंत, मौलाना आझाद, डॉ बाबासाहेब आंबेडकर, एस. आर. जयकर, सरोजिनी नायडू, हंसाबेन मेहता, राजकुमारी कौर यांचा मान्यवर सदस्य म्हणून समावेश करण्यात आला होता. घटना समितीच्या ११४ बैठका झाल्या होत्या. घटना समितीने ११ उपसमित्या देखील नेमल्या होत्या. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मसुदा समितीची स्थापना करण्यात आली. मसुदा समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४७ रोजी स्वीकारण्यात आला. तोच २६ नोव्हेंबर हा दिवस आपण संविधान दिन म्हणून साजरा करतो. ४ नोव्हेंबर १९४७ रोजी भारताच्या संविधान समितीच्या मसुदा समितीने संविधानाचा कच्चा मसुदा तयार करून तो चर्चा विनिमयासाठी सभागृहात ठेवला. त्यावर २ वर्ष ११ महिने १८ दिवस इतकी प्रदीर्घ चर्चा झाली आणि त्यानंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी तिचा स्वीकार करण्यात आला. संविधान समितीने मसुदा समितीवर सात सदस्यांची नियुक्ती केली होती. त्यापैकी एक मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर हे होते. त्यांच्यानंतर अलादी कृष्ण स्वामी अय्यर, के. एम मुन्शी, गोपाल अय्यंगार, एम. माधवराव, मोहम्मद सादुल्ला, डी. सी. खेतान हे इतर सदस्य होते. असे जरी असले तरी त्यापैकी एकाचे निधन झाले होते, एक अमेरिकेत निघून गेले होते, एकाने राजीनामा दिला होता आणि एक सदस्य पूर्णवेळ राजकारणात व्यस्त होते. त्यामुळे संविधानाचा मसुदा तयार करण्याची पूर्ण जबाबदारी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर आली व त्यांनी ती जबाबदारी अत्यंत निष्ठेने आणि तन्मयतेने पार पाडली आणि एकट्यानेच संपूर्ण संविधानाचा मसुदा तयार करून तो घटना समितीचे अध्यक्ष डॉ राजेंद्र प्रसाद यांच्याकडे २६ जानेवारी १९४९ सुपूर्द केला. शेवटी २४ जानेवारी १९५० रोजी अंतिम बैठक झाली आणि २६ जानेवारी १९५० पासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली. भारत एक सार्वभौम प्रजासत्ताक राज्य बनले त्यामुळे २६ जानेवारी हा दिवस आपण मोठया उत्साहात प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो. संविधान निर्मितीत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. जगातील विविध देशांच्या संविधानाचा अभ्यास करुन डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वसमावेशक अशी राज्यघटना तयार केली म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असे म्हटले जाते.

# बुलढाण्यात राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या तालुकाध्यक्षावर प्राणघातक हल्ला

## सुनील कोल्हे यांच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरु


### शरद पवार राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या तालुकाध्यक्षावर प्राणघातक हल्ला; दोन बाईकवर येऊन चार जणांनी केला रॉडने वार

दैनिक आपला विदर्भ

**मोताळा/प्रतिनिधी** : मोताळा येथील राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (शरद पवार गट) तालुकाध्यक्ष सुनील कोल्हे यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे.ही घटना तालखेड आणि तालखेड फाट्यादरम्यान दि.२५ नोव्हेंबर रोजी सायंकाळीच्या दरम्यान घडली.या घटनेत सुनिल कोल्हे गंभीर जखमी झाले असून या घटनेमुळे मात्र सर्वत्र खळबळ उडाली आहे.

घटनेबाबत प्राप्त माहितीनुसार राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष सुनिल कोल्हे हे कामानिमित्त बाहेर गेले असता या दरम्यान त्यांच्यावर चार जणांनी बाईकवर तोंडाला रुमाल बांधून येत कोल्हे यांच्यावर हल्ला केला. हल्लेखोर हे तोंडावर रूमाल बांधून होते. यात सुनील कोल्हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांचा डावा पाय आणि डावा हात फ्रॅक्चर झाला असल्याची माहिती आहे. त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून ॲड. जयश्री शेळके यांनी रुग्णालयात दाखल होत जखमी कोल्हे यांची भेट घेतली. तसेच हल्लेखोरांवर कडक कारवाईची मागणी अड्. जयश्री शेळके यांनी केली आहे. दरम्यान कोल्हे यांना पाहण्यासाठी अनेकांनी जिल्हा रुग्णालयाकडे धाव घेतली होती.





### पोलीस प्रशासनाने हल्लेखोरावर कठोर कारवाई करावी : शेळके

महाविकास आघाडीचे ज्यांनी प्राणपणाने काम केले, अशा लोकांवर प्राण घातक हल्ले केले जात असून निकाल लागल्याच्या दिवसापासून महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांच्या घरावर तलवारी घेऊन चाल करणे, ज्यांच्या घरावर बॅनर होते त्यांना मारहाण करणे तसेच धमकावण्याचे प्रकार सुरु आहे.याकडे जिल्हा पोलीस प्रशासनाने लक्ष देऊन हल्लेखोरांना शोधून त्यांच्यावर तात्काळ कठोरात कठोर कारवाई करावी, बुलढाण्याचा बिहार करण्याचा प्रयत्न काही लोकांकडून सुरू असून जिल्हा पोलिस अधीक्षकांनी या प्रकरणाला गांभीर्याने घ्यावे,अशी मागणी जयश्री शेळके यांनी पत्रकारांशी संवाद साधताना केली.

## तुमच्या बाळासाठी निळे आधार कार्ड बनवलंत का? 'या' सोप्या स्टेप्स करा फॉलो

आधार कार्ड हे आपल्या देशातील महत्वाचे दस्तावेज आहे. प्रत्येक कामात आधार कार्ड विचारले जाते. त्यामुळे प्रत्येकजण स्वत:जवळ आधार कार्ड बाळगतो. वयाने मोठ्या व्यक्तीच नव्हे तर लहान मुलांसाठीदेखील आधार कार्ड महत्वाचे आहे. मुलांच्या शाळेतील प्रवेशासाठी तुम्हाला आधार कार्डची गरज लागणार आहे. त्यामुळे तुम्ही अजूनही आधार कार्ड बनवले नसेल तर जास्त वेळ दवडू नका. नंतर अचानक घाई करण्यापेक्षा आताच आधार कार्ड बनवून घ्या. पुढे देण्यात आलेल्या सोप्या स्टेप्स फॉलो करुन तुम्ही तुमच्या बाळाचे आधार कार्ड बनवू शकता.

लहान मुलांना काय गरज आहे आधार कार्डची? असं तुम्हाला अजूनही वाटत असेल तर आधी त्याचे महत्व जाणून घ्या. निळे आधार कार्ज २०१८ पासून सुरु झाले आहे. हे आधार कार्ड पाच वर्षांच्या मुलांसाठी वैध असते. म ोठ्या व्यक्तींप्रमाणे लहान मुलांचे बोटाचे ठसे यात घेतले जात नाहीत. त्यांना बायोमेट्रिक नसते. तुमचे बाळ ५ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी असेल तर तुम्ही त्याच्यासाठी निळ्या आधार कार्डसाठी अर्ज करु शकता. निळे आधार कार्ड बनवण्याच्या प्रक्रियेत तुम्हाला कोणतेही शुल्क द्यावे लागणार नाही.

कोणती कागदपत्रे?

लहान मुलांसाठी निळे आधार कार्ड काढायचे असेल तर नावनोंदणीसाठी आवश्यक आहे. यासाठी कागदपत्रे कोणती ते जाणून घेऊया. यावेळी तुम्हाला मुलाचे जन्म प्रमाणपत्र किंवा हॉस्पिटल डिस्चार्ज स्लिप सबमिट करावी लागेल. मुलं शाळेत जात असतील तर शाळेचे ओळखपत्र देखील पुरावा म्हणून तुम्ही सादर करु शकता.

मुलांची माहिती त्यांच्या पालकांच्या ळघ शी जोडलेल्या चेहऱ्याच्य फोटोच्या आधारे प्रसिद्ध केली जाते. असे असले तरी जेव्हा मूल १५ वर्षांचे होते तेव्हा त्याला किंवा तिला त्यांच्या दहा बोटांचा, बुबुळ स्कॅन आणि फेस आयडी असा बायोमेट्रिक डेटा अपडेट करणे आवश्यक असते.

तुमच्या बाळाचे निळे आधार कार्ड बनवण्यासाठी जवळच्या नावनोंदणी केंद्रावरच अपॉइंटमेंट बुक करा.बुक केलेल्या तारखेच्या दिवशी मुलासह आधार नोंदणी केंद्रावर जा. यावेळी पालकांचे आधार कार्ड, तुमचा पत्ता पुरावा आणि मुलाचे जन्म प्रमाणपत्र यांसारखी महत्त्वाची कागदपत्रे सोबत नेण्यास विसरू नका.

कसा कराल अर्ज?

णखऊअख वेबसाइट ीळवरळ.र्सें. ळप गशक्ष शिश.

आधार कार्डचा पर्याय निवडा.

मुलाचे नाव, त्याच्या पालकांचापालकांचा फोन नंबर भरा. इतर आवश्यक माहिती भरा.

ब्लू आधार कार्ड नोंदणीसाठी अपॉइंटमेंट स्लॉट निवडा.

यानंतर निवडलेल्या जवळच्या केंद्रावर जा.

मुलाच्या युआयडी शी लिंक करण्यासाठी तुमचे आधार कार्ड तपशील द्या.

येथे मुलाचा फोटो द्या. येथे तुम च्याकडे बायोमेट्रिक डेटा मागितला जाणार नाही.

मुलाचा फोटो काढला जाईल. यानंतर कागदपत्र पडताळणीची प्रक्रिया सुरू होईल.

आता तुमची निळ्या आधार कार्डची प्रक्रिया पूर्ण झाल्याचा तुमच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एक म ेसेज येईल.

६० दिवसांच्या आत तुमच्या म ुलाच्या नावाचे निळे आधार कार्ड जारी झालेले असेल.

## प्रमाणाच्या बाहेर खाल्ले तेलकट पदार्थ, या ४ प्रकारे शरीर करा डिटॉक्स

कधी कधी लालसेपोटी आपण तेलकट पदार्थ किंवा गोड पदार्थ जास्त खाण्याची चूक करतो. तसे, लोकांना बाहेरचे किंवा तेलकट पदार्थ खाण्याची अशा प्रकारे सवय होते की त्यांना इच्छा असूनही त्याकडे दुर्लक्ष करता येत नाही. ही पद्धत आपल्याला मधुमेह आणि उच्च कोलेस्ट्रॉलचे रुग्ण बनवू शकते. तुम्हाला असेही वाटते का की तेलकट अन्न खाण्याची चूक त्रासाचे कारण बनू शकते. दैनंदिन जीवनात छोट्या छोट्या पद्धतींचा अवलंब केल्यास तेलकट अन्नामुळे होणारे नुकसान बऱ्याच प्रम ाणात टाळता येते.

तेलकट पदार्थ खाल्ल्यानंतर या गोष्टी करा

हलके कोमट पाणी प्या : जर आपण पाणी कमी प्यायले, तर त्यामुळे लहान आतडे अन्नातून पचनासाठी पाणी खेचतात. त्यामुळे डिहायड्रेशन आणि बद्धकोष्ठतेची समस्या सुरू होते. जेव्हाही तुम्ही तेलकट पदार्थ खाता, त्यानंतर हलके कोमट पाणी पिणे खूप फायदेशीर ठरते. याने तुमची पचनक्रिया चांगली राहील.

डिटॉक्स पेये प्या : एका अभ्यासानुसार कोरियन महिलांनी लिंबू पाणी, लिंबाचा रस आणि लिंबू डिटॉक्स आहाराने शरीरातील चरबी कमी केली. त्याचप्रमाणे तुम्ही डिटॉक्स ड्रिंक्स आणि मसालेदार गोष्टींपासून अंतर ठेवून शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकू शकता. तेलकट पदार्थ खाल्ल्यानंतर नेहमी डिटॉक्स ड्रिंक प्या.

फिरणे : जड किंवा तेलकट अन्न खाल्ल्यानंतर किमान ३० मिनिटे चालणे आवश्यक आहे. असे केल्याने अन्नाचे पचन तर होतेच, पण पचनक्रियाही सुधारते. जेवल्यानंतर नेहमी सावकाश चालावे कारण जलद चालणे किंवा शारीरिक हालचालींमुळे फायद्याऐवजी नुकसानाला सामोरे जावे लागू शकते.

प्रोबायोटिक्स घ्या : जर तेलकट किंवा जड अन्न तुमच्या आहाराचा भाग असेल तर आता ही सवय बदला. अन्न हेल्दी बनवण्यासाठी त्यात दह्यासारख्या प्रोबायोटिक पदार्थांचा समावेश करा. यामुळे पोटाचे आरोग्य चांगले राहते. म्हणूनच रोज एक कप दही खाण्याची सवय लावा.

## शरीराला आजारांपासून दूर ठेवते चांदी! कमी असेल या समस्यांचा धोका

चांदीचे दागिने परिधान केल्याने नि:संशयपणे तुम्हाला क्लासी लुक मिळू शकतो. पण तुम्हाला माहीत आहे का की दागिने बनवण्यासाठी जी चांदी वापरली जाते, ती देखील आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर असते. आयुर्वेदानुसार चांदी आपल्या शरीरातील अनेक आजारांपासून दूर राहण्यास मदत करते. चांदीमुळे आपल्या आरोग्याच्या समस्या तर दूर होतातच पण शास्त्रात याला पवित्र धातू म्हणून नाव देण्यात आले आहे. याम ुळेच देवाला चांदीच्या भांड्यांमध्ये भोग अर्पण केले जातात.

एक काळ असा होता की राजघराण्यांमध्ये सोन्या–चांदीसह धातूपासून बनवलेल्या भांड्यांमध्येच अन्न खाल्ले जायचे. मात्र, आजही अनेक घरांमध्ये चांदीची भांडी क्वचितच वापरली जातात. आयुर्वेदानुसार चांदी १०० टक्के बॅक्टेरियामुक्त असते. चला जाणून घेऊयात चांदी आपल्या आरोग्यासाठी किती फायदेशीर आहे.



व्हायरस आणि बॅक्टेरियापासून करते संरक्षण

संशोधनानुसार चांदीमध्ये अँटी–बॅक्टेरियल आणि अँटी–मायक्रोबियल गुणधर्म असतात, ज्यामुळे ते आपल्या शरीरातून बॅक्टेरिया, बुरशी आणि विषाणू नष्ट करू शकते. सिल्व्हर आयन जीवाणूंवर हल्ला करण्यासाठी अनेक यंत्रणा वापरतात. तथापि, चांदी पेशी कशी मारते, हे स्पष्ट नाही. यासोबतच ते सर्दी आणि फ्लूशीही लढते.

मजबूत करते रोगप्रतिकारक शक्ती

अँटीबॉडीज, पांढऱ्या रक्त पेशी, रसायने आणि प्रथिने – ते सर्व जीवाणू, रोग आणि विषाणूंशी लढण्यासाठी एकत्र काम करतात. त्या सर्वांनी शरीरात समस्या निर्माण करणाऱ्या गोष्टींना एलियन म्हणून ओळखले. चांदी हे अशा रासायनिक घटकांपैकी एक आहे, ज्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत राहते आणि तुम्ही निरोगी राहता.

मानसिक आजारात फायदेशीर

डोळ्यांचे आजार, ॲसिडिटी आणि शरीरातील जळजळ दूर करण्यात चांदी मदत करते. चांदीची भांडी वापरल्याने मानसिक आजारांपासूनही आराम मि ळतो. याशिवाय शरीरातील साखरेची पातळीही सामान्य राहते, ज्यामुळे मधुमेहाचा धोका कमी होतो. चांदीचा आपल्या मनाशीही संबंध आहे. म्हणूनच लहान मुलांचे मन तेज करण्यासाठी चांदीच्या भांड्यात अन्न किंवा पाणी दिले जाते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत यासाठी कोपरीतील महिलांनी महाआरती करत गणरायाला घातले साकडे

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाले आहेत. या निवडणुकीत जनतेने महायुतीला पूर्ण बहुमत दिलं आहे. राज्यात सरकार स्थापनेच्या प्रक्रियेला वेग आला आहे. महायुतीमधील राज्याचा मुख्यमंत्री कोण अशा चर्चा सुरु झाल्या आहेत. यातच भाजप हा जास्त संख्याबळ असणारा महायुतीमधील मोठा पक्ष असल्यामुळे देवेंद्र फडणवीसच राज्याचे मुख्यमंत्री होणार या चर्चांना उधान आले आहे.

मात्र अद्यापही मुख्यमंत्री कोण याची घोषणा झालेली नाही. शिवसेना शिंदे गटाच्या आमदारांनी एकनाथ शिंदे यांनी पुन्हा मुख्यमंत्री व्हावे अशी इच्छा व्यक्त केली आहे आणि दुसरीकडे भाजपकडून देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री होतील असे दावे केले जात आहेत. शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते ठिकठिकाणी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री व्हावेत यासाठी देवाकडे साकडे घालताना दिसत आहेत. अशातच ठाण्यातील महिलांनी आज कोपरी परिसरातील दौलत नगर येथील सिद्धिविनायक मंदिरात गणरायाला प्रार्थना करीत पुन्हा एकदा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे व्हावे याकरिता महाआरती केली. आजपर्यंत महिलांचा कोणीही विचार केला नाही मात्र एकनाथ शिंदे यांनी महिलांसाठी लाडकी बहीण योजना आणली त्यामुळे आमचा लाडका भाऊ एकनाथ शिंदेच मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवर बसले पाहिजेत अशा प्रतिक्रिया महिलांनी यावेळी दिल्या आहेत.







## महत्त्वाचे...

### हॉलमार्कचा स्टॅम्प नसल्याने बीआयएसची परेश ज्वेलर्सवर कारवाई; ग्राहकांनी तक्रार करण्याचे बीआयएसचे अधिकाऱ्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याणमध्ये दागिन्यावर हॉलमार्कचा स्टॅम्प नसल्याने बीआयएसची परेश ज्वेलर्सवर दि.२५ नोव्हेंबर २०२४ रोजी कारवाई करण्यात आली. कल्याण मधील परेश ज्वेलर्सवर हॉलमार्कचा स्टॅम्प नसल्याने बीआयएसची ने कारवाई करून १६१० ग्रॅम वजनाचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. ज्या ग्राहकांसोबत असा प्रकार घडला त्यांनी तक्रार करावी, असे आवाहनही बीआयएसचे अधिकारी अमन सिंग यांनी केले आहे.

### ठाण्यात सिध्दीविनायक मंदिरात महाआरती; एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री होण्यासाठी नागरिकांनी केली प्रार्थना





दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :**कशिश पार्क येथील सिद्धीविनायक मंदिरात आज महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुन्हा एकदा मुख्यमंत्री पदावर विराजमान व्हावेत, यासाठी प्रार्थना करण्याचा उद्देशाने ही महाआरती करण्यात आली. या महाआरतीत महिला आणि पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सर्वांनी एकनाथ शिंदे यांच्या उज्वल भवितव्यासाठी आणि महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी सिध्दीविनायकासमोर प्रार्थना केली. उपस्थितांनी एकनाथ शिंदे यांना पुनश्र्च मुख्यमंत्री व्हावेत असे साकडे गणरायाला घातले आहे.

### छ. संभाजीनगर ग्रामीण पोलिसांनी विधानसभा काळात आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्यांवर केले गुन्हे दाखल



दैनिक आपला विदर्भ

**छ. संभाजीनगर/प्रतिनिधी :** मतमोजणीच्या दिवशी सिल्लोड मध्ये मतदान केंद्रावर जी घटना घडली त्या अनुषंगाने सीआर नंबर २३७, २२४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामध्ये बी एन एस चे १२५ ,१८९ २, आणि १३२ प्रमाणे त्याच्यासह १३५ महाराष्ट्र पोलीस कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा तपास सुरु आहे. त्या व्यतिरिक्त मतदानाच्या दिवशी पाच ठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ज्यामध्ये घाटंबरी ,अजिंठा पोलीस स्टेशन अंतर्गत त्याचबरोबर विरगाव, वैजापूर, खुलताबाद आणि फुलंब्री या पाच ठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आले होते. यामध्ये दोन ठिकाणी किरकोळ मारामारीचे गुन्हे होते जे विरगाव अजिंठा आणि वैजापूर या ठिकाणी दोन ठिकाणी मारहाणीचे गुन्हे दाखल केले आणि इतर ठिकाणी तांत्रिक उल्लंघनाचे गुन्हे दाखल करण्यात आले असल्याची माहिती पोलीस अधीक्षक विनयकुमारराठोड यांनी दिली आहे.

### भिवंडी पश्चिमेत पुन्हा मत विभाजनाचा भाजपला फायदा

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या मोठ्या मताधिक्यामुळे विजयाची खात्री असलेल्या भिवंडी पश्चिम या मुस्लिम बहुल मतदारसंघात महाविकास आघाडीच्या म्हणजेच काँग्रेस उमेदवाराचा पराभव झाला आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडीचा घटक पक्ष असलेल्या समाजवादी पक्षाने उभा केलेला उमेदवार, काँग्रेस पक्षात झालेली बंडखोरी आणि त्यात एमआयएमने उभा केलेला उमदेवार यामुळे झालेल्या मत विभाजनाचा फायदा भाजपचे आमदार महेश चौगुले यांना होऊन त्यांचा विजय झाला. दोन निवडणुकीत मतविभाजनामुळेच चौगुले यांचा विजय झाला होता, यंदाही हीच परंपरा कायम असल्याचे चित्र दिसून आले.

## एक महिना थांबा, मराठा काय आहेत ते कळेल! पत्रकारांवर टोलेबाजी करत मनोज जरांगे पाटील यांचा इशारा

**छ. संभाजीनगर/प्रतिनिधी :** आम्ही मैदानात नव्हतो, समाजाला मोकळीक होती, मराठा मतांवरच विजय मिळाला आहे. मराठा आमदारांची संख्या वाढली आहे, हे काही लोकांनी लक्षात घ्यावं असा टोला छगन भुजबळ यांना जरांगे पाटील यांनी लगावलाय.

जरांगे फॅक्टर फेल कसा? – विधानसभा निवडणुकीत ज्यांचा विजय झाला त्याचं कोणी श्रेय घ्यायचं ते त्यांनी ठरवावं. जरांगे फॅक्टर फेल झाला अशी टीका होत आहे. मात्र, आम्ही मैदानात नव्हतोच. त्यामुळे आम्हाला कोण आले आणि कोण नाही त्याचं घेणंदेणं नाही. जे आले ते सगळे मराठ्यांच्या जीवावर आले. जरांगे फेल यावर ते उद्विग्नपणे म्हणाले, मराठा कळायला तुमची सगळी हयात जाईल. मात्र तुम्हाला जरांगे फॅक्टर कळायचा नाही, आम्ही मैदानात नाही उगाच गप्पा ठोकतात. गोड बोलून मराठ्यांचे मत मिळवले, त्यांच्याच ताकदीवर तुम्ही निवडून आलात. आम्ही उगाच दुसऱ्यांच्या गर्दीत जात नाही. आम्हाला देणंघेणं नाही. मराठा पुन्हा मैदानात आहे. आरक्षण द्यावे लागेल. आमच्या लेकरांसाठी आम्ही पुन्हा तयार आहोत. आरक्षण द्या नाहीतर आम्ही पुन्हा छातीवर बसणार. नवीन सरकार स्थापन होताच आम्ही आमच्या आंदोलनाची तारीख जाहीर करणार. आम्ही सामूहिक उपोषणाला सुरुवात करणार असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी दिलाय.

आता आरक्षण द्या – एका जातीवर निवडणूक लढवणे शक्य नसल्याने लढलो नाही. बाजूला गेलो, सरकार कोणाचे आले तरी आम्हाला संघर्ष करावा लागणार, लढावं लागणार हे माहीत होतं. त्यामुळे आम्ही आमची तयारी सुरू केली. कोणी मस्तीत येण्याचं काम करू नका. आम्हाला छेडू नका, सरकार म्हणून पालकत्व तुमच्याकडे आहे. लोकशाही मार्गाने आम्ही आमची मागणी करणार, सत्तेत आहे म्हणून गुंडगिरी, दादागिरी करणार असली भाषा आमच्यासमोर टिकणार नाही. बेइमानी करायची नाही कोणी आले तरी सुटका नाही. समाजाला संकटात सोडायचं नाही म्हणून माघार घेतली. अडीअडचणी येणाऱ्या व्यक्तीला मतदान करा असं सांगून समाज मोकळा सोडला होता. मराठा समाजाच्या मतांशिवय निवडून येणे कोणासाठीही शक्य नाही आणि सत्ता स्थापन करू शकत नाही. आम्ही दिलं आता तुम्ही समाजाला द्या. आमचं सरकार आलं म्हणून आता काही सांगू नका.

## विधानसभेतील पराभवानंतर उद्धव ठाकरेंचा मोठा निर्णय; आदित्य ठाकरेंवर सोपविली महत्त्वाची जबाबदारी!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे विधानसभा निवडणुकीत २० आमदार जिंकून आले आहेत. तर, संपूर्ण महाविकास आघाडीत केवळ ५६ आमदार जिंकले आहेत. आता थोड्या दिवसांनी राज्यात नवं सरकार स्थापन होईल. तत्पुर्वी उद्धव ठाकरेंनी आदित्य ठाकरेंवर मोठी जबाबदारी सोपविली आहे. याबाबत आज विजयी आमदारांची मातोश्री येथे बैठक झाली. या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) विधान परिषदेचे आमदार अंबादास दानवे यांनी यासंदर्भात माहिती दिली.



''विधानसभेच्या नवनिर्वाचित सदस्यांसह आज बैठक झाली. उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. विधिमंडळ पक्षाची ही बैठक होती. यात विधानसभेचे नवनिर्वाचित सदस्य आणि विधान परिषदेचे सदस्य उपस्थित होते. विधानसभेच्या शिवसेना गटनेतेपदी भास्कर जाधव यांची निवड सर्वानुमते केली आहे. प्रतोद म्हणून सुनीलप्रभू यांची नियुक्ती केली. तर, दोन्ही विधिमंडळ (विधानसभा आणि विधान परिषद) संयुक्त गटनेता म्हणून आदित्य ठाकरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे'', अशी माहिती अंबादास दानवे यांनी केली. बैठकीनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

विरोधी पक्षनेते पदावर काय म्हणाले अंबादास दानवे?

विरोधी पक्षाबाबत तिन्ही पक्ष एकत्र बैठक घेऊन निर्णय घेतील. सरकारच बनलं नाही, सराकारवर अजून कोणी दावा केला नाही. त्यामुळे सरकार बनल्यावर विरोधी पक्ष नेत्याविषयी चर्चा होईल, असं अंबादास दानवे म्हणाले.

गटनेते पद म्हणजे काय?

गटनेता हा निवडून आलेल्या सर्व आमदार आणि खासदारांचं नेतृत्व सभागृहात करत असतो. २०१९ मध्ये शिवसेनेच्या गटनेते पदी एकनाथ शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली होती. परंतु, शिवसेनेतील बंडानंतर शिवडी विधानसभेचे आमदार अजय चौधरी यांना गटनेता करण्यात आलं. त्यानंतर, आता ही जबाबदारी भास्कर जाधव आणि आदित्य ठाकरेंवर सोपवण्यात आली आहे. निवडून आलेल्या सदस्यांची भूमिका एकच असावी, याकरता सर्वानुमते गटनेत्याची निवड केली जाते. या गटनेत्याकडे सर्वाधिकार दिले जातात. गटनेत्याकडून पक्षहितासाठी काही निर्णय घेतले जातात. परंतु, या निर्णयाविरोधात जर एखादा सदस्य गेला, तर त्याच्या निलंबनाची शिफारस सभागृह अध्यक्षांकडे केली जाते. गटनेत्याला सभागृहात अनन्यसाधारण महत्त्व असते.

## तिकडे फडणवीसांच्या मुख्यमंत्रीपदाची चर्चा, तर इकडे अजित पवार गटाचे नेते म्हणतात, ''एकदा तरी''

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर सत्तास्थापनेच्या घडामोडींना वेग आला आहे. मुंबई व दिल्लीत दिग्गज नेत्यांच्या निवासस्थानी, पक्ष कार्यालयांमध्ये बैठका होऊ लागल्या आहेत. सर्वात महत्त्वाची चर्चा चालू आहे ती म्हणजे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाबाबत. महायुतीला २३५ जागांवर विजय मिळाला आहे. त्यातल्या १३२ जागा भाजपाच्या आहेत. पण विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आहेत. त्यांच्या नेतृत्वाखालीच राज्याच्या निवडणुका लढवल्या गेल्या. त्यामुळे मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस की पुन्हा एकनाथ शिंदे? अशी चर्चा चालू असताना अजित पवारांच्या आमदारांकडूनही वेगळा सूर लावला जात आहे.

लोकसभा निवडणुकीत झालेली पीछेहाट भरून काढत महायुतीनं विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला जोरदार झटका दिला. महाविकास आघाडी अवघ्या ४९ जागांवर अडकली. त्यामुळे पुन्हा एकदा महायुतीचे सरकार येणार हे स्पष्ट झाले. पण त्याचवेळ मुख्यमंत्रीपद कुणाला द्यायचे? मंत्रीपदांचे किंवा खात्यांचे वाटप कुणाला किती आणि कसे करायचे? अशा मुद्द्यांवर खल सुरू झाला. आता महायुतीतील तिन्ही पक्षांमधून मंत्रीपदासाठीच्या इच्छुकांच्या विनंत्या येऊ लागल्या आहेत.



राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते व मावळत्या विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी टीव्ही ९ शी बोलताना मंत्रीपदाची इच्छा व्यक्त केली आहे. ''मी जिल्हा परिषद, पंचायत समिती, विधानभवन असे सगळे केले आहे. आता माझी एकच इच्छा राहील की मला एखादे मंत्रीपद द्यावे. मी मंत्रालयात रोज जातो. पण स्वत:चे असे काही तिथे असावे यासाठी मी ही मागणी करतोय. मला कोणतेही खाते दिले तरी चालेल, पण मंत्री करावे अशी माझी विनंती आहे. मला ते मिळेल असा माझा विश्वास आहे. मी चौथ्यांदा आमदार म्हणून निवडून आलो आहे'', असे ते म्हणाले आहेत.

दरम्यान, यावेळी झिरवाळ यांनी अजित पवारांसाठी मुख्यमंत्रीपदाची मागणी केली आहे. ''माझी, महाराष्ट्रातल्या युवकांची, लाडक्या बहिणींची इच्छा आहे की अजित पवार मुख्यमंत्री व्हावेत. ही जनतेची इच्छा आहे. दिलेला शब्द कधीच परत न घेणारा माणूस अशी अजित पवारांची ख्याती आहे. कामाचा माणूस म्हणून त्यांची ख्याती आहे. पण महायुतीचे नेते मिळून याबाबत निर्णय घेतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह, नितीन गडकरी, राज्यातले देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे, एकनाथ शिंदे, स्वत: अजित पवार हे सगळे मिळून जो निर्णय घेतील, तो सगळ्यांना मान्य करावा लागेल. पण आमची विनंती असेल की अजित पवारांना एकदा मुख्यमंत्री करावे'', असे ते म्हणाले.

''आमचा स्ट्राईक रेट चांगला आहे. पण भाजपाचे संख्याबळ मोठे आहे. पण तरीही आमची विनंती आहे की अजित पवारांना मुख्यमंत्री करावे. बघू. अजित पवारांनी ११ वेळा अर्थखाते चालवले आहे. इतक्या वेळा उपमुख्यमंत्री राहिले. आता एकदा मुख्यमंत्री करून तर बघावे अशी आमची प्रामाणिक इच्छा आणि विनंती आहे'', असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी बोलताना नरहरी झिरवाळ यांनी शरद पवारांचा पक्ष अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विलीन होण्याची शक्यता नाकारता येत नाही अशी सूचक प्रतिक्रिया दिली. ''शक्यता नाकारता येत नाही. राजकारणात काहीही होऊ शकतं. शरद पवारांचा पक्ष अजित पवारांच्या पक्षात विलीनही होऊ शकतो. त्यात वावगं काहीही नाही. राजकारणात कोण कधी कुणाचा शत्रू, कधी मित्र या गोष्टी चालूच असतात'', असे ते म्हणाले.

## अजितदादा – रोहित पवार अचानक भेटीतील संवादाचे राज्यभर पडसाद

दैनिक आपला विदर्भ

**कराड/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त कराडमधील त्यांच्या समाधीस्थळी श्रध्दांजली वाहण्यासाठी आलेले उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांचे पुतणे कर्जत- जामखेडचे नवनिर्वाचित आमदार रोहित पवार हे समोरसमोर आले असता, नेहमीच्या शैलीत बोलताना ''ढाण्या थोडक्यात वाचलास, माझी सभा झाली असतीतर तुझ काही खरं नव्हत'' अशी मिश्कीलपणे फिरकी घेत अजित पवारांनी ''काकांचे दर्शन घे'' असे म्हणताच रोहित पवारांनी त्यांचे चरणस्पर्श केले. आणि बारामतीचे पवार कुटुंब राजकीयदृष्ट्या एकच असल्याचे सूर व त्याचे पडसाद राज्यभर उमटले.

कृष्णा- कोयनेच्या प्रीतिसंगमावरील यशवंतराव चव्हाण यांच्या समाधी परिसरात आज सोमवारी सकाळी मोठ्या घडामोडी घडल्या. त्यातील अजितदादा अन् रोहित पवारांची दिलखुलास भेट उपस्थितांना आव्वाक करणारी ठरली. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर आणि विधानसभेच्या निकालानंतर बारामतीच्या काका- पुतण्याच्या या अचानक घडलेल्या भेटीने राजकीय वर्तुळाच्या भुवया ताणल्या गेल्या, माध्यमांना खुमासदार वेगळा विषय मिळाला. कारण या वेळी अजित पवारांनी कर्जत- जामखेड मतदारसंघात माझी सभा न झाल्याने अल्प मताधीक्यातील पुतण्या रोहितला त्याचा नामी फायदा झाला. एका अंगाने ही राजकीय मदतच झाल्याची चर्चा सुरु झाल्याचे सूचित केले. यावर कर्जत- जामखेडचे केवळ १,२४३ मतांनी पराभूत झालेले 'महायुती'चे पराभूत उमदवार राम शिंदे यांनी काका- पुतण्याच्या कटाचा मी बळी ठरल्याचा आरोप केला. तर, या साऱ्या घटनाक्रमाने राज्यभर खळबळ उडवून दिली आहे.



दरम्यान, अजित पवारांनी केलेल्या वक्तव्यावर रोहित पवार म्हणाले, ते माझे काका आहेत म्हणून मी पाया पडलो, विचारांमध्ये भिन्नता आत्ता तरी आहे. शेवटी जी काही संस्कृती आहे, वडीलधारी व्यक्ती आणि माझ्या गेल्या २०१९ च्या निवडणुकीत मला त्यांची खूप मदत केली होती आणि त्याअनुषंगाने तसेच ते माझे काका असल्यामुळे शेवटी संस्कृतीप्रमाणे पाया पडणं ही माझी जबाबदारी आहे. तसेच हे यशवंतराव चव्हाणसाहेबांचे स्मृतीस्थळ आहे, तरी इथे कुठला भेदभाव करून चालत नाही, इथे संस्कृती पाळणे फार महत्त्वाचे आहे, आम्ही तरी अशी संस्कृती पाळतो आणि ते मी केल्याचे रोहित पवार यांनी सांगितले.

माझ्या कर्जत- जामखेड मतदारसंघात अजितदादांची सभा झाली असती तर नक्कीच काही प्रमाणात वर- खाली झाले असते, उलटही होऊ शकले असते. पण, बारामतीमध्ये ते अडकून पडले होते. त्यांना माझ्या मतदारसंघात येता आले नाही. शेवटी ते मोठे नेते आहेत, निर्णय त्यांचा होता. पार्टी म्हणून पाहिले तर, आज सगळ्यात जास्त आमदार हे त्यांचे निवडून आलेत, ही चांगली गोष्ट आहे मी त्यांचे अभिनंदन सुद्धा केलेले आहे असे रोहित पवार यांनी शेवटी सांगितले.

## विविध वृत्त...

### माजी आमदार दादाराव केचे यांचा राजकीय संन्यासाचा निर्णय मागे



दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी :** आर्वी येथील भाजपचे माजी आमदार दादाराव केचे यांनी राजकीय संन्यासाचा निर्णय मागे घेत असल्याची घोषणा दि.२५ नोव्हेंबर २०२४ रोजी केली आहे. आर्वी येथील कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात दादाराव केचे यांनी निर्णय मागे घेण्याची भूमिका स्पष्ट केली आहे. आर्वी येथील भाजपचे माजी आमदार दादाराव केचे यांनी कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर राजकीय संन्यासाचा निर्णय मागे घेत असल्याचे जाहीर करून काही जणांनी तक्रारी केल्यानंतर व्यथित होऊन संन्यास घेण्याचा निर्णय घेतला होता पण आज त्यांनी निर्णय मागे घेतला असल्याचेही त्यांनी सांगितले. पक्षासाठी कार्य करत राहणार असल्याची माहिती दादाराव केचे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

### मुंबईत दारू पिऊन गाडी चालवताना भीषण अपघात, दोन अल्पवयीन मुलांचा दुर्दैवी अंत

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबईच्या पश्चिम द्रुतगती महामार्गावर विलेपार्ले या ठिकाणी दारू पिऊन भरधाव वेगाने कार चालवत असल्यामुळे कारचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात दोन अल्पवयीन मुलांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून आरोपी कारचालक साहिल महताला विलेपार्ले पोलिसांनी अटक आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, गोरेगावमधून दारूची पार्टी करून शनिवारी पहाटे ३:३० च्या सुमारास साहिल मेहता, जॉर्डन जिमी यांच्यासह दोन अल्पवयीन मुलं, असे एकूण चार कॉलेजचे मित्र जेवण घेण्यासाठी बांद्राच्या दिशेने निघाले होते.बांद्रा परिसरातून जेवण घेऊन येत असताना साहिल मेहता भरधाव वेगाने कार चालवत असल्यामुळे कारचालकाचे कारवरून नियंत्रण सुटलं.

दोन अल्पवयीन मुलांचा मृत्यू

त्यानंतर कार विलेपार्लेजवळ डिव्हायडरला धडकल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात कारमध्ये मागे बसलेले दोन अल्पवयीन मुलं सार्थक कौशिक आणि जलाल धीर यांचा जागेवरच मृत्यू झाला. तर दोन जण किरकोळ जखमी झाले आहेत. कार चालवणारा साहिल मेहता हा दारू पिऊन कार चालवत असल्याने अपघात झाल्याची माहिती त्याच्या मित्रांनी पोलिसांना दिली आहे.

ब्लड सॅम्पल तपासणीला पाठवले

विलेपार्ले पोलिसांनी या प्रकरणी कार चालकाविरोधात गुन्हा दाखल केला असून कार चालक साहिल मेहताला अटक केली आहे. साहिल मेहता कार चालवताना किती दारू प्यायला होता? दारूच्या नशेमुळे हा अपघात झाला का? यासंदर्भात ब्लड सॅम्पल घेऊन विलेपार्ले पोलिसांनी तपासासाठी लॅबमध्ये पाठवले आहे. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

### संगमनेरमध्ये बाळासाहेब थोरातांच्या धक्कादायक पराभवानंतर सत्यजीत तांबेंची पहिली प्रतिक्रिया

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्या महायुतीने २८८ पैकी २३६ जागा जिंकत नवा इतिहास रचला आहे. महायुतीच्या महालाटेत महाविकास आघाडीचा अक्षरश: धुव्वा उडाला. महायुतीचा २३६ जागांवर विजय झाला तर महाविकास आघाडीला केवळ ४९ जागांवर यश मिळाले. तर संगमनेर विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांचा धक्कादायक पराभव झाला. महायुतीचे उमेदवार अमोल खताळ यांनी बाळासाहेब थोरात यांचा पराभव केला. या पार्श्वभूमीवर बाळासाहेब थोरात यांचे भाचे नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजीत तांबे यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

सत्यजीत तांबेयांनी आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. अजित पवारांच्या भेटीनंतर सत्यजित तांबे यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की,अजितदादांनी मला विशेष करून विचारलं की, बाळासाहेब थोरात यांचा पराभव कशामुळे झाला? काय कारणे असावेत. त्यांनी बाळासाहेब थोरात यांच्या पराभवाचे विशेष दु:खही व्यक्त केले. बाळासाहेब थोरात यांच्यासारखा सीनियर माणूस हा पराभूत व्हायला नको होता. शेवटी त्यांच्या अनुभवाचा सभागृहामध्ये होणारा वापर हा हे सर्व वरिष्ठ नेत्यांना गरजेचा होता.

संगमनेरचा निकाल धक्कादायक : सत्यजीत तांबे

बाळासाहेब थोरात यांची सभागृहातली कमी निश्चितच सर्व नेत्यांना जाणवल्याशिवाय राहणार नाही. संगमनेरचा निकाल धक्कादायक आहे. ४० वर्ष बाळासाहेब थोरात यांनी सर्वांना सोबत घेऊन काम केलं. ज्यांनी धनुष्यबाणाला मतदान केल असेल ते का केलं असेल? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला. तसेच संगमनेर विधानसभा मतदारसंघातील बाळासाहेब थोरात यांच्या पराभवाचे आम्ही आत्मपरीक्षण करू, असे देखील सत्यजीत तांबे यांनी म्हटले आहे.

धांदरफळ गावातून महायुतीला मताधिक्य

दरम्यान, संगमनेर विधानसभेत प्रचारादरम्यान काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या कन्या जयश्री थोरात यांच्या विषयी सुजय विखे पाटील यांच्या सभेत बेताल वसंतराव देशमुख यांच्या वादग्रस्त वक्तव्य केले होते. मात्र वसंतराव देशमुख यांनी बेताल वक्तव्य केलेल्या धांदरफळ गावातच महायुतीला मताधिक्य मिळाल्याचे दिसून आले आहे.

# मेहकरमध्ये दोन गटात वाद; गाड्यांची जाळपोळ २३ जणांना अटक

## पोलिसांचे शांतता निर्माण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न







दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर शहरात दोन गटात झालेल्या वादाचे पर्यावसन हे दंगलीपर्यंत गेले असून मेहकर शहरात वाहनांची तोडफोड, जाळपोळ आदी प्रकार घडल्याने शांतताप्रीय असलेल्या मेहकर शहराला काही विघ्नसंतोषी लोकांमुळे गालबोट लागले आहे. कायदा हातात घेणाऱ्यांची गय केली जाणार नसून दोषींवर कारवाई केली जात आहे. मात्र नागरिकांनी कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, शांतता पाळावी, पोलीस प्रशासन सत्व बाबींवर लक्ष ठेवून आहे, तरी नागरिकांनी अफवांवर विश्र्वास न ठेवता शांतता पाळावी, असे आवाहन बुलढाणा अप्पर जिल्हा पोलीस अधीक्षक बीबी महामुनी यांनी केले आहे.

मेहकर शहरात दि.२४ नोव्हेंबर रोजी रात्री दोन गटांमध्ये वाद झाला. या वादातून माळीपेठ भागासह इतर काही ठिकाणची वाहने पेटवून देण्यात आली. यात त्या वाहनांचे प्रचंड नुकसान झाले. याप्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत २३ आरोपींना ताब्यात घेतले आहे. या घटनेमुळे शहरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे. तर दि.२५ नोव्हेंबरपासून मेहकरमध्ये संचारबंदी लागू करण्यात आली असून कडकडीत बंद पाळण्यात आला आहे.

नागरिकांनी कुठल्याही अफवांवर विश्र्वास ठेवू नये, असे आवाहन बुलढाणा अप्पर जिल्हा पोलीस अधीक्षक बीबी महामुनी यांनी केले आहे.

### शहरातील संचारबंदी पुर्णत: शिथील

मेहकर शहरातील दोन गटात झालेल्या वादाचे पर्यावसन वाहनाची तोडफोड, जाळपोळ पर्यंत गेली होती. यामुळे दोन गटात तेढ निर्माण झाली होती. त्यामुळे परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यासाठी उपविभागीय दंडाधिकारी यांच्या आदेशाने मेहकर शहरात दि.२५ नोव्हेंबर रोजी रात्री १२ वाजतापासून संचारबंदी लागू करण्यात आली होती. सदर परिस्थिती नियंत्रणात आली असल्याने उपविभागीय दंडाधिकारी यांच्या आदेशाने दि. २५ नोव्हेंबर रोजी रात्री शहरातील संचारबंदी पूणत: शिथील करण्यात आली आहे. मेहकर शहरात दि.२४ नोव्हेंबर रोजी रायबा धाबा मेहकर येथे किरकोळ वादावरून दोन गटात वाद निर्माण होऊन दोनही गटातील युवक समोरासमोर येऊन त्यांनी माळीपेठ मरीमाता चौकातील मिश्र वस्तीतील रोडवर उभ्या असलेल्या दोन चारचाकी व तीन ते चार दुचाकी वाहनांची जाळपोळ करून नुकसान केले व दगडफेक केली. सदर घटनेवरून मेहकर शहरात दोन गटात तणावाची परिस्थिती निर्माण झालेली होती. सदर ठिकाणी तगडा पोलीस बंदोबस्त लावण्यात आलेला आहे. त्यामुळे परिस्थिती नियंत्रणात आली असून शहरात शांतता असून परिस्थिती नियंत्रणात असल्याने शहरात लागू केलेली संचारबंदी पूणत: शिथील करण्यात यावी.असे आदेश मेहकर उपविभागीय दंडाधिकारी रवींद्र जोगी यांनी दि.२५ नोव्हेंबर रोजी रात्री उशिरा दिले आहेत.

### शांतताप्रीय शहरात सामाजिक सलोखा कायम ठेवा : आ. खरात



मेहकर शहरात घडलेल्या घटनांनी मी व्यथित झालो आहे. शांतताप्रिय मेहकर शहराला गालबोट लावण्याचा प्रयत्न काही समाज कंटकांकडून होत आहे. यात सर्वसामान्य नागरिकांना हकनाक त्रास सहन करावा लागत आहे. आपण सत्व एकच असून एकमेकांना सोबत घेऊन चालणारो आहोत, त्यामुळे अफवांना बळी न पडता शहरातील सर्व लोकशाहीप्रेमी नागरिकांनी, जातीधर्मातला सामाजिक सलोखा कायम ठेवावा. पोलीस प्रशासन शांतता स्थापित करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करीत आहेत. त्यांना सर्वांनी सहकार्य करावे,असे आवाहन मेहकर विधानसभा मतदार संघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी केले आहे.

### 'कांगुवा' फ्लॉप होताच सूर्याला मिळाली वाईट बातमी! बंद झाला ३५० कोटींचा चित्रपट

**मुंबई/प्रतिनिधी** : तामिळ सुपरस्टार सूर्या आता चेन्नईहून मुंबईत शिफ्ट झाला आहे. सूर्या मुंबईत येण्यामागे मुलांच्या शिक्षणाचे कारण सांगत असला, तरी या तमिळ अभिनेत्याला आता बॉलिवूडमध्ये प्रवेश करण्याची इच्छा असल्याचे बोलले जात होते. काही दिवसांपूर्वी झालेल्या 'कांगुवा'च्या पत्रकार परिषदेत सूर्याला त्याच्या 'कर्ण' चित्रपटाबद्दल विचारण्यात आले, तेव्हा त्याने सांगितले की, सध्या त्याबद्दल काहीही निश्र्चित नाही, पण त्याची देहबोली वेगळीच गोष्ट सांगत होती. दरम्यान, 'कर्ण'ची वाट पाहणाऱ्या सूर्याच्या चाहत्यांसाठी एक वाईट बातमी आहे. जान्हवी कपूर आणि सूर्या यांचा ३५० कोटींचा पॅन इंडिया चित्रपट आता थांबला आहे.

ओमप्रकाश मेहराचा ड्रीम प्रोजेक्ट 'कर्ण' फरहान अख्तरची प्रोडक्शन कंपनी एक्सेल एंटरटेनमेंट बनवणार आहे. सुमारे ३५० कोटींच्या मेगा बजेट असलेल्या या चित्रपटात सूर्या सूर्यपुत्र कर्णाची भूमिका साकारणार होता, तर जान्हवी या चित्रपटात द्रौपदीची भूमिका साकारणार होती.

### अजित पवारांनी महायुतीचा धर्म पाळला नाही; भाजपा आमदार राम शिंदेंचा आरोप

दैनिक आपला विदर्भ




**मुंबई/प्रतिनिधी** : कराड येथील प्रीतीसंगमावर यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतीस्थळावर दर्शन घेण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार गेले असता त्यांची आणि रोहित पवार यांची समोरासमोर भेट झाली. याप्रसंगी रोहित पवार यांनी अजित पवार यांचे चरण स्पर्श करून आशीर्वाद घेतले. यादरम्यान अजित पवार म्हणाले की, ''बेट्या थोडक्यात वाचलास माझी सभा झाली असती तर,...'' यावरून रोहित पवार यांचे प्रतिस्पर्धी आणि भाजपा नेते राम शिंदे यांनी अजित पवारांवर टीकेची झोड उठवलीय. पवार कुटुंबाने पूर्णपणे कटकारस्थान रचून आपला पराभव केल्याचा आरोप राम शिंदे यांनी केलाय, ते मुंबईत बोलत होते.कटकारस्थान करून पराभव केला? : या विषयावर बोलताना राम शिंदे म्हणाले की, ज्या दिवशी निवडणुकीचा निकाल लागला, त्या दिवशी रोहित पवारांनी अजित पवारांची रात्री उशिरा भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले होते. पण आज प्रीतीसंगमावर सर्वांसमोर उघडपणे रोहित पवार आणि अजित पवार यांची भेट झालीय. याप्रसंगी बोलताना अजित पवार यांनी उघडपणे सांगितले की, ''बेट्या थोडक्यात बचावलास, मी सभा घेतली असती तर...'' यावरून सर्व काही उघड होतं. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृती स्थळावर अशा पद्धतीचं राजकारण त्यांनी केलंय. निवडणुकीमध्ये विजय, पराजय होत असतात. परंतु अशा पद्धतीने कटकारस्थान करून एखाद्या सामान्य माणसाला हरवणे हे नीतीला मान्य नाही.

सभेसाठी पक्षाकडे वारंवार मागणी : राम शिंदे पुढे म्हणाले की, अजित पवार यांनी कर्जत-जामखेड मतदारसंघामध्ये सभा घ्यावी म्हणून मी पक्षाकडे वारंवार मागणी केली होती. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनाही विनंती केली होती. परंतु त्यांनी सभा दिली नाही. ७ ऑक्टोबरला मी स्वत: अजित पवार यांनी सभा घ्यावी, यासाठी त्यांना मेसेज पाठवला होता. अशा प्रकारे महायुतीचा धर्म अजित पवार यांनी पाळला नाही. रोहित पवारांनी मतदारसंघामध्ये ६० लाख रुपये वाटले, त्याची एफआयआर कॉपीसुद्धा माझ्याकडे आहे. जो काही प्रकार झाला आहे तो अतिशय वाईट असून, याबाबत पुढे काय कारवाई होते ते पाहावे लागेल, असेही राम शिंदे म्हणालेत.

## नाशिक जिल्ह्यातील अनेक माजी आमदारांची अनामत रक्कम जप्त

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी** : लोकसभा निवडणुकीत राज्यासह नाशिक जिल्ह्यात महाविकास आघाडीला मिळालेल्या यशानंतर नाशिक जिल्ह्यामध्ये अनेक मतदारसंघांमध्ये अटीतटीचा सामना होईल अशी परिस्थिती होती. मात्र अनेक मतदारसंघात धक्कादायक निकाल समोर आलेत. यात बागलाण मतदारसंघातील माजी आमदार दीपिका चव्हाण यांना १०.२ टक्के मते, चांदवडचे माजी आमदार शिरीषकुमार कोतवाल ९.८ टक्के मते, इगतपुरीचे माजी आमदार काशिनाथ मेंगाळ ९.२ टक्के मते तर माजी आमदार निर्मला गावित यांना ११.२ टक्के मते मिळाली तर इतर उमेदवार असे एकूण १०८ उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली. यातील माजी आमदार सत्तेपासून दूर राहिल्याने जनतेचे काम करण्यास आलेल्या अडचणी, तरुण मतदारांना जोडण्यात आलेले अपयश, सक्रिय जनसंपर्क कमी, तसंच मागील पाच वर्षे सत्तेपासून दूर झाल्याने दुबळे झालेले संघटन अशी प्रमुख कारणे राजकीय विषकांनी सांगितली.



माजी आमदार गावित यांची दोनदा अनामत जप्त - इगतपुरी मतदारसंघातील माजी आमदार निर्मला गावित यांनी काँग्रेसकडून दोनवेळा, शिवसेनेकडून एकवेळा आणि अपक्ष एकदा अशा चारवेळा निवडणूक लढवल्या आहेत. त्यात दोनवेळा त्या विजयी झाल्या तर दोनवेळा त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. यंदा त्यांनी अपक्ष उमेदवारी केली, त्यात त्यांचा मोठा पराभव झाला. केवळ २३ हजार ७६७ मते मिळाल्यानं त्यांची अनामत रक्कम जप्त झाली.

माजी आमदार कोतवालांचा सहावा पराभव - चांदवडचे माजी आमदार शिरीषकुमार कोतवाल यांनी यंदा आठवी विधानसभा निवडणूक लढवली, आतापर्यंत आठपैकी दोनवेळा त्यांना विजय मिळाला तर सहावेळा त्यांना पराभवला सामोरे जावे लागले. यात २०२४ चा पराभव मोठा ठरला त्यांना चौथ्या क्रमांकाची २३ हजार ३३५ मते मिळाली. यात त्यांची अनामत रक्कम जप्त झाली.

अनामत रक्कम जप्त झालेले उमेदवार - येवला - १०, मालेगाव मध्य -११, मालेगाव बाह्य - १५, निफाड - ७, इगतपुरी - १६, दिंडोरी - ११, सिन्नर - १०, कळवण - ५, नांदगाव ११, चांदवड - १०, बागलाण - १६.

किती असते अनामत रक्कम - लोकप्रतिनिधी कायदा १९५१ नुसार लोकसभेच्या उमेदवारांसाठी निवडणूक आयोगाकडे २५ हजार रुपये अनामत रक्कम भरावी लागते. प्रवर्ग श्रेणीमधील उमेदवारांना १२ हजार ५०० रुपये भरावे लागतात. तर विधानसभेच्या उमेदवारांना १० हजार तर प्रवर्गासाठी ५ हजार रुपये भरावे लागतात.

## २६ नोव्हेबर पासून देशात प्रकृती परिक्षण अभियानाला होणार सुरुवात : आयुष मंत्री प्रतापराव जाधव

दैनिक आपला विदर्भ





**बुलढाणा/प्रतिनिधी** :आयुर्वेदाचा प्रचार आणि प्रसार देशांमध्ये झाला पाहिजे हर घर आयुर्वेद पोहोचविण्याच्या दृष्टिकोनातून देशांमध्ये देश का प्रकृती अभियानाला उद्या २६ नोव्हेबर संविधानदिनापासून संपूर्ण देशामध्ये सुरू करत आहोत अशी माहिती केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर येथे मोफत आरोग्य व रोगनिदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते त्यानंतर माध्यमांशी बोलताना ही माहिती दिली ते म्हणाले की देशातील पाच कोटी लोकांपर्यंत हे अभियानाचे उदिष्ट आहे आयुर्वेदानुसार, एखाद्या व्यक्तीचा स्वतः चा विशिष्ट स्वभाव असतो जो जन्माच्या वेळी ठरवला जातो. एखाद्या व्यक्तीच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी निसर्गाचे ज्ञान महत्वाचे आहे.

यावेळी आयुष मंत्री श्री जाधव म्हणाले की, मोदीजींनी माझ्यावर मोठ्या विश्र्वासाने या मंत्रालयाची जबाबदारी सोपवली आहे. ही जबाबदारी पार पाडताना मला आयुर्वेदाला पुढे नेऊन प्रत्येक घरापर्यंत आयुर्वेद घेऊन जायचे आहे. आजाराच्या शेवटच्या टप्प्यातही आयुर्वेदाने लोकांवर उपचार केल्याचे मी पाहिले आहे. आपण सर्वांनी मिळून आयुर्वेदिक उपचार प्रत्येक घरापर्यंत पोहोचवायचे आहेत. आयुर्वेदात आधुनिकता आली पाहिजे, असे सांगून आयुर्वेदाला पुढे नेण्यासाठी आम्ही ही मोहीम सुरू केली आहे. प्रत्येक घरापर्यंत आयुर्वेद पोहोचवण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न पुर्ण करण्याचा प्रयत्न करणार आहेत हे अभियान संपूर्ण देशामध्ये २६ नोव्हेंबर संविधान दिनापासून सुरू होणार आहे तर अभियानाची सांगता २५ डिसेंबरला माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त होणार आहे.